# <u>आकाशातला प्रकाश</u>

बाहेर प्रकाश खूपच लखलखत होता. कितीही डोळे मिटले तरी तो प्रकाश दिसतच होता. तो प्रकाश कसला आहे ते मात्र कळत नव्हते. आता मला काळजी वाटायला लागली.

मी दुसऱ्या कुशीवर वळले. पण जरा डोळे मिटले की पुन्हा लखलख दिसत होती. मग मी खिडकीच्या बाजूला वळले. विचार करायला लागले. “काय असेल बरं? गाड्यांचे दिवे? छे! त्यांचा प्रकाश इतका नसतो. पोलिसांच्या गाडीचे दिवे? छे! यात लाल-निळा रंग नाहीये. आता आईला विचारायलाच पाहिजे.”

मी हळूच खाली आले. आई पुस्तक वाचत होती. रात्री मला खाली पाहून तिला जरा आश्चर्यच वाटले. मी म्हणाले, “बाहेर प्रकाश खूपच लखलखत आहे. मला कळत नाही काय चाललं आहे.”

आईनी तिचं पुस्तक खाली ठेवलं. मला घेऊन ती वर आली. माझ्या पलंगावर आम्ही दोघी खिडकीकडे तोंड करून पडलो.

आई म्हणाली, “राधा, आपण मागच्या वर्षी गाडीतून काकांकडे गेलो होतो ते तुला आठवतय का? त्याचं घर किती लांब होतं नाही?”

मी म्हणाले, “हो, खूपच लांब होतं.”

आई म्हणाली, “तिकडे काकांच्या घराजवळ वादळ चालू आहे. विजा चमकत आहेत. पण ते खूप लांब आहे. त्यामुळे आपल्याला फक्त प्रकाशच दिसतो आहे. त्यांचा गडगडाट ऐकू येत नाही.”



“खरंच की,” मी विचार केला. “त्याशिवाय आकाशात कसला प्रकाश दिसणार?”

**Unrestricted**

~~~

1. खालील वाक्ये जर मुलांनी म्हणाली असती तर कशी झाली असती ते लिहा.

| | |
|---|---|
| मी दुसऱ्या कुशीवर वळले. | |
| विचार करायला लागले. | |
| मी हळूच खाली आले. | |
| मी म्हणाले, “हो, खूपच लांब होतं.” | |

2. खालील वाक्ये भूतकाळात आहेत. ती वर्तमानकाळात लिहा.

| | |
|---|---|
| डोळे मिटले तरी प्रकाश दिसतच होता. | |
| मला काळजी वाटायला लागली. | |
| आई पुस्तक वाचत होती. | |
| मी विचार केला. | |
| काकांचं घर खूप लांब होतं. | |

3. राधाला झोप का येत नाही?

_______________________________________________

4. तुम्हाला कशानी तरी रात्री झोप आली नाही असे झाले आहे का? त्याबद्दल लिहा.

_______________________________________________

_______________________________________________


© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH
~~~